# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## निष्क्रमण [सुर्यावलोकन]

निष्क्रमण याचा अर्थ आहे बाहेर काढणे. या संस्कारात बाळाला सूर्य तसेच चंद्राची ज्योती दाखवण्याची प्रथा आहे. भगवान भास्कराचे तेज आणि चंद्राची शीतलता यांच्याशी बाळाची ओळख करून देणे हाच यामागचा उद्देश आहे. यामागे बाळाला तेजस्वी आणि विनम्र बनवण्याची रचनाकर्त्यांची कल्पना असावी. त्या दिवशी देवी-देवतांचे दर्शन आणि त्यांच्याकडून बाळाच्या दीर्घ आणि यशस्वी जीवनासाठी आशीर्वाद ग्रहण केला जातो. जन्माच्या चौथ्या महिन्यात हा संस्कार करण्याची प्रथा आहे. पहिल्या तीन महिन्यांपर्यंत बाळाचे शरीर बाह्य वातावरण, कडक ऊन, वारा इत्यादींसाठी अनुकूल नसते, त्यामुळे पहिले तीन महिने काळजीपूर्वक त्याला घरातच ठेवले पाहिजे. त्यानंतर हळूहळू त्याला बाह्य वातावरणाच्या संपर्कात आणले पाहिजे. या संस्काराचा हेतू हाच की बालक समाजाच्या संपर्कात येऊन त्याला सामाजिक परिस्थितीचे ज्ञान होईल.या संस्काराबरोबरच "सूर्यावलोकन" हा संस्कार देखील करतात. बालकाला प्रथमच घराबाहेर नेऊन विधिपूर्वक सूर्यदर्शन तसेच शक्यतोवर देवदर्शन करवतात. पंचमहाभूताप्रति बालकाचा आदरभाव जागृत व्हावा हा या संस्कारामागील हेतू आहे.जन्म झाल्यापासून तिसऱ्या महिन्यांत जन्मदिवशीं अथवा जन्मनक्षत्रीं इष्टदेवतांचें पूजनपूर्वक अलंकार केलेल्या मुलास सूर्याचे दर्शन करवावें. चवथ्या महिन्यांत चांगल्या काळीं अग्नि, चंद्र, गाय ह्यांचें दर्शन करवावें. " स्वास्तिनो० " ह्या मंत्रानें पिता इत्यादिकांनीं बालकाला मांडीवर घ्यावें. "आशुःशिशानो०" असौयासेना०" ह्या पंधरा मंत्रांचे सूक्ताचा विनियोग बालकाच्या आयुष्याच्या अभिवृद्धिकडे आहे.

" तच्चक्षुर्देव० " हा मंत्र म्हणून बालकास सूर्याचें दर्शन करवावें. असा हा सूर्यावलोकन संस्कार संपला. ह्यापुढील निष्क्रमण म्हणजे बाहेर निघणें हा संस्कार ह्याबरोबरच तंत्रानें करितात. माझ्या बालकाचें आयुष्य आणि श्री म्हणजे लक्ष्मीची वृद्धि, बीजगर्भापासून झालेल्या दोषाचा नाश करण्याच्याद्वारानें श्री परमेश्वराच्या प्रीतिकरितां निष्क्रमण म्हणजे बाहेर निघणें हें कर्म करीन, असा संकल्प करून त्याच्या अंगत्वानें स्वस्तिवाचन, आभ्युदयिक ग्रहयज्ञ वगैरे अक्रावा, पूर्व इत्यादि दिशांमध्यें असणारे इंद्र, अग्नि, यम, निऋति, वरुण, वायु, कुबेर, ईशान आठ लोकपालांची, चंद्र, सूर्य, वासुदेव, गगन ह्या सर्वांची यथाक्रमेकरून तांदुळांचें राशीवर पूजा करावी. ब्राह्मणांना भोजन द्यावें. त्यांच्याकडून स्वस्तिवाचन बोलवावें. सायंसंध्या इत्यादिक करावें. बालकाला सोन्याच्या अथवा कृत्रिम अलंकारांनीं यथाशक्ति सुशोभित करावें. पूर्वी केलें नसेल तर आतां बालकाकडून अग्नि, चंद्र, आणि धेनू ह्यांचें दर्शन करवावें. घोडा इत्यादि वाहनावर बसवून त्या बालकाला मामानें अथवा दाईनें फ़िरवून आणावें. त्या फ़िरण्याचें वेळेस भार्या, पुत्र, विद्वान् ब्राह्मण, ज्ञातिबांधव सुवासिनी समुदाय, आरसा, पूर्णकलश, फुले, हळद, अक्षता, दीपाची माळा, ध्वज, लाह्या, ह्यांनीं युक्त कन्यागण, मंगल वाद्ये, ह्यांचा घोष करीत फिरवावें. " कनिक्रद० " " प्रदक्षिणि० " " आवदं० " इत्यादि शकुंतादि सूक्ताचा पाठ करीत करीत घराचे बाहेर जाऊन " चंद्रार्क" ह्या मंत्रांनीं बालकाचे रक्षणाकरितां देवांची प्रार्थना करून श्रीविष्णु किंवा श्रीशिव ह्या दोघांपैकी एकाचे देवळांत अथवा बंधूच्या घरी जाऊन तेथे देवाचें सुमंगल वाद्यघोषपूर्वक पूजन करावें. शेणानें सारविलेल्या चतुष्कोणाकृति जागेवर थान्य इत्यादि ठेवून त्यावर बालकाला बसवून " त्र्यंबक ० " ह्या मंत्राचा जप करून भस्मानें अथवा अक्षतांनीं बालकाचे मस्तकावर, कपाळावर रक्षण करून अपूप म्हणजे अनारसे इत्यादिकांनीं भूतेशान, गणेश ह्यांची पूजा करावी. बालकाला भक्ष्य इत्यादिकांनीं संतुष्ट करून बालकाला ब्राह्मणांकडून आशीर्वाद देववून देवतेला नमस्कार आणि प्रदक्षिणा बालकाकडून करवाव्यात, आणि मामा इत्यादिकांच्या अथवा जवळ असलेल्या बंधूंच्या घरीं पूर्वीप्रमाणें नेऊन तेथें दान, भेट इत्यादिकांनीं बालकाला संतुष्ट करवून आपल्या घरी परत जाऊन ब्राह्मणांकडून आशीर्वाद बोलवून त्या ब्राह्मणांना आणि सुवासिनींना यथाशक्ति दक्षिणा देऊन बंधूसह भोजन करावें. कुमारीचेही सर्व ह्याप्रमाणें समजावें. येथें होम करावा अथवा न करावा. होमपक्षी बालकाला अलंकार घातल्यानंतर लौकिक अग्नीची प्रतिष्ठा करावी. तेथें जातकर्माप्रमाणेंच सांगितलेल्या देवतांना आहुति देऊन अग्नि, चंद्र, ह्यांचे दर्शन इत्यादि आपल्या घरी येण्यापर्यंत सर्व करून स्विष्टकृत् इत्यादि होम समाप्त करून ब्राह्मणांचा आशीर्वाद इत्यादि सर्व करवावें असा क्रम आहे. असा हा निष्क्रमण संस्कार संपला. संस्कार केव्हां करावेत, या विषयी ऋषींची दोन मते आहेत. एक बालकाच्या जन्मानंतर ३ ऱ्या महिन्याच्या शुक्लपक्षी तृतीयेस, कारण शुक्लपक्षी १-२ - ३ स चंद्राचे दर्शन स्पष्ट होतें. दुसरे मत हे आहे कीं, ३ रा महिना पुरा होऊन चवथ्या महिन्यांत शुक्लपक्षातील जन्मतिथि किंवा जन्मनक्षत्र यादिवशीं करावे याला प्रयाणास सांगितलेले शुभतिथि नक्षत्रादि घ्यावे.

### कर्णवेध

रोगापासून रक्षण होऊन अलंकार धारण करणे याकरितां आणि बालकाची पुष्टि, आयुष्य व श्री यांची वृद्धि व्हावी एतदर्थ हा संस्कार सांगितला आहे. ६ व्या, ७ व्या, ८ व्या महिन्यांत, शुभवारी जया (३-८-१३) तिथि तसेंच पूर्णा (५-१०-१५ ) तिथि, पुनर्वसु, धनिष्ठा, मृग, पुष्य, अश्विनी, हस्त, श्रवण, तिन्ही उत्तरा या नक्षत्री शुक्लपक्षी कर्णवेध करावा. जन्ममास, भद्रा, चातुर्मास हे वर्ज्य आहेत. जन्मदिवसापासून दहावा बारावा किंवा सोळावा ह्या दिवशीं बालकाचे कान टोंचावे ज्योतिःशास्त्रांत सांगितलेल्या शुभ दिवशीं विष्णु, रुद्र, ब्रह्मा, सूर्य, चंद्र दिक्पाल अश्विनीकुमार, सरस्वती, गाय, ब्राह्मण, गुरु यांची पूजा करून आळत्याच्या रसानें अंकित असा कान पुरुषाचा पूर्वी उजवा टोंचून नंतर डाव टोंचावा. स्त्रियांचा डावा पूर्वी टोंचावा बालकाच्या आठ अंगुलें लांबीची सूची (सुई) असावी, ती अशी - राजपुत्राच्या कर्णवेधा विषयीं सुवर्णाची, ब्राह्मण व वैश्य यांना रुप्याची, शूद्राला लोखंडाची याप्रमाणें सुई करावी. कानाला छिद्र (भोंक) करणें तें सूर्याचें किरण आंत शिरेल इतकें मोठें करावें. कर्णविधावांचून बालकाला पाहिलें असतां पूर्वपुण्याचा नाश होतो.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com